रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1 ] | नई दिल्ली, जनवरी 19-25, 2023/पौष 29-माघ 5 (शक) 1944 | [खंड 21 |
| No. 1 ] | NEW DELHI, JANUARY 19-25, 2023/PAUSHA 29-MAGHA-5 (SAKA) 1944 | [Vol. 21 |
| अं. १ ] | नवी दिल्ली, जानेवारी १९-२५, २०२३/पौष २९-माघ ५ (शके) १९४४ | [खंड २१ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मेजॉरिटी ॲक्ट, 1875 ; (2) दि ऑफिशल् ट्रस्टी ॲक्ट, 1913 ; (3) दि लीगल् सर्विसेस् ऑथोरिटी ॲक्ट, 1987 ; (4) दि गुडस् ॲन्ड सर्व्हिसेस् टॅक्स (कॉम्पेन्सेशन टू स्टेट) ॲक्ट, 2017 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Majority Act, 1875 ; (2) The Official Trustees Act, 1913 ; (3) The Legal Services Authorities Act, 1987 ; (4) The Good and Services Tax (Compensation to States) are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मेजॉरिटी ॲक्ट, १८७५ ; (२) दि ऑफिशल् ट्रस्टी ॲक्ट, १९१३ ; (३) दि लीगल् सर्विसेस् ऑथोरिटी ॲक्ट, १९८७ ; (४) दि गुडस् ॲन्ड सर्व्हिसेस् टॅक्स (कॉम्पेन्सेशन टू स्टेट) ॲक्ट, २०१७ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX



| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | सज्ञानता अधिनियम, १८७५<br>The Majority Act, 1875 | ५ |
| २ | शासकीय न्यासी अधिनियम, १९१३<br>The Official Trustees Act, 1913 | ७ |
| ३ | विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७<br>The Legal Services Authorities Act, 1987 | १९ |
| ४ | वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई) अधिनियम, २०१७<br>The Goods and Services Tax (Compensation to States) Act, 2017 | ४१ |

# विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७

(१९८७ चा अधिनियम क्रमांक ३९)

[२३ मे, २०२२ रोजी यथाविद्यमान]

[११ ऑक्टोबर, १९८७]

**आर्थिक किंवा इतर निःसमर्थतेच्या कारणांमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय मिळवण्याची संधी नाकारली जात नाही याची खात्री करून घेण्याच्या दृष्टीने समाजातील दुर्बल घटकांसाठी निःशुल्क व सक्षम विधिविषयक सेवा देण्यासाठी विधि सेवा प्राधिकरण गठित करण्याकरिता आणि कायद्याची यंत्रणा राबवताना समान संधीच्या तत्वावर न्यायाची अभिवृद्धी होत आहे याची सुनिश्चिती करून घेण्यासाठी लोक अदालत आयोजित करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७, असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) तो, [१] * * * संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) तो, केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[२] अंमलात येईल ; आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींकरिता आणि निरनिराळ्या राज्यांकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि कोणत्याही राज्यासंबंधात या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या प्रारंभासंबंधीच्या कोणत्याही निर्देशाचा अन्वयार्थ, त्या राज्यातील त्या तरतुदींचा प्रारंभाचा निर्देश आहे असा लावण्यात येईल.

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

[३][(क) " दावा " यात न्यायालयापुढील कोणताही दावा किंवा कार्यवाही यांचा समावेश होतो ;

(कक) " केंद्रीय प्राधिकरण " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेले राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, असा आहे ;

(ककक) " न्यायालय " याचा अर्थ, दिवाणी, फौजदारी किंवा महसूल न्यायालय, असा आहे आणि त्यात न्यायिक किंवा न्यायिकवत कार्ये पार पाडण्यासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेले कोणतेही न्यायाधिकरण किंवा इतर कोणतेही प्राधिकरण यांचा समावेश होतो ;]

(ख) " जिल्हा प्राधिकरण " याचा अर्थ, कलम ९ अन्वये घटित केलेले जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, असा आहे ;

[४][(खख) " उच्च न्यायालय विधि सेवा समिती " याचा अर्थ, कलम ८ (क) अन्वये घटित केलेली उच्च न्यायालय विधि सेवा समिती, असा आहे ;]

(ग) " विधि सेवा " यामध्ये कोणतेही न्यायालय किंवा इतर प्राधिकरण किंवा न्यायाधिकरण यांच्यापुढे कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्यासाठी कोणतीही सेवा देणे आणि कोणत्याही विधिविषयक बाबींवर सल्ला देणे, यांचा समावेश होतो ;

---

१. सन २०१९ चा अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ९५ आणि पाचवी अनुसूची यांद्वारे, ' जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून ' हा मजकूर वगळण्यात आला.

२. अधिसूचना क्रमांक एस.ओ. ८९३ (इ), दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ पहा **भारताचे राजपत्र** असाधारण भाग दोन, कलम ३ (ii).

३. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर खंड (क) ऐवजी दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(घ) " लोक अदालत " याचा अर्थ, प्रकरण सहा अन्वये आयोजित केलेली लोक अदालत, असा आहे ;

(ङ) " अधिसूचना " याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(च) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[१][(चच) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले विनियम, असा आहे ;]

(छ) " योजना " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी केंद्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, किंवा जिल्हा प्राधिकरण यांनी तयार केलेली कोणतीही योजना, असा आहे ;

(ज) " राज्य प्राधिकरण " याचा अर्थ, कलम ६ अन्वये घटित केलेले राज्य विधि सेवा प्राधिकरण, असा आहे ;

(झ) " राज्य शासन " यामध्ये, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाचा समावेश होतो ;

[२][(ञ) " सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती " याचा अर्थ, कलम ३क अन्वये घटित केलेली सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती, असा आहे ;

(ट) " तालुका विधि सेवा समिती " यांचा अर्थ, कलम ११क अन्वये घटित केलेली तालुका विधि सेवा समिती, असा आहे ;]

(२) ज्या क्षेत्रात इतर कोणतीही अधिनियमिती किंवा तिची कोणतीही तरतूद अंमलात नसेल त्या क्षेत्रात अशा इतर कोणत्याही अधिनियमितीच्या किंवा तिच्या कोणत्याही तरतुदीच्या या अधिनियमातील कोणत्याही निर्देशाचा अन्वयार्थ, त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या, कोणत्याही असल्यास, तत्सम कायद्याचा किंवा तत्सम कायद्याच्या कोणत्याही प्रस्तुत तरतुदींचा तो निर्देश आहे, असा लावण्यात येईल.

प्रकरण दोन

## राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण

**राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण घटित करणे.**

[३]**[३.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमान्वये केंद्रीय प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यास नेमून देण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी " राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण " या नावाने संबोधण्यात येणारा निकाय घटित करील.

(२) केंद्रीय प्राधिकरण पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल :—

(क) भारताचा मुख्य न्यायमूर्ती, जो मुख्य आश्रयदाता असेल ;

(ख) भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राष्ट्रपतीद्वारे नामनिर्देशित करावयाचा सर्वोच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश, जो कार्यकारी अध्यक्ष असेल ; आणि

(ग) भारताच्या मुख्य न्यायमुर्तीशी विचारविनिमय करून केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येईल असा अनुभव व अर्हता धारण करणारे सरकारने नामनिर्देशित करावयाचे अशा संख्येतील इतर सदस्य.

---

१. सन १९९४ या अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे कलम ३ ऐवजी दाखल करण्यात आली (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) केंद्र सरकार, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, त्या सरकारकडून विहित करण्यात येतील किंवा केंद्रीय प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षाकडून नेमून देण्यात येतील असा त्या केंद्रीय प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षतेखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि अशी कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्या सरकारकडून विहित करण्यात येईल असा अनुभव व अर्हता धारण केलेल्या एखाद्या व्यक्तीची, केंद्रीय प्राधिकरणाचा सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करील.

(४) केंद्रीय प्राधिकरणाचे सदस्य व सदस्य-सचिव यांचा पदावधी व त्याच्याशी संबंधित इतर शर्ती, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(५) केंद्रीय प्राधिकरणास या अधिनियमाखालील आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल इतक्या संख्येतील अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(६) केंद्रीय प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी, केंद्र सरकारकडून, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येईल इतके वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि ते अशा इतर सेवा शर्तीच्या अधीन असतील.

(७) केंद्रीय प्राधिकरणाचे सदस्य-सचिव, अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन यांसह, केंद्रीय प्राधिकरणाचा प्रशासकीय खर्च भारताच्या एकत्रित निधीतून भागविण्यात येईल.

(८) केंद्रीय प्राधिकरणाचे सर्व आदेश व निर्णय, सदस्य-सचिव किंवा त्या प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला केंद्रीय प्राधिकरणाचा इतर कोणताही अधिकारी अधिप्रमाणित करील.

(९) केंद्रीय प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ केंद्रीय प्राधिकरणात कोणतेही पद रिक्त असल्याच्या कारणावरून किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

**सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती.**

**३ क.** (१) केंद्रीय प्राधिकरण, त्याने केलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्याच्या व अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती म्हणून संबोधण्यात येणारी एक समिती घटित करील.

(२) ही समिती, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीने नामनिर्देशित करावयाच्या पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल,—

(क) सर्वोच्च न्यायालयाचा विद्यमान न्यायाधीश, जो अध्यक्ष असेल ; आणि

(ख) केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा संख्येतील आणि असा अनुभव व अर्हता धारण करणारे सदस्य.

(३) भारताचा मुख्य न्यायमूर्ती, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल असा अनुभव व अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीची समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करील.

(४) समितीचे सदस्य व सचिव यांचा पदावधी व त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती केंद्रीय प्राधिकरणाकडून विनियमाद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(५) समितीस आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी केंद्र सरकारकडून भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येतील इतक्या संख्येतील अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल.

(६) समितीचे अधिकारी व इतर कर्मचारी, केंद्र सरकारकडून भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून विहित करण्यात येईल इतके वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि ते अशा इतर सेवा शर्तीच्या अधीन असतील.]

**केंद्रीय प्राधिकरणाची कार्ये.**

४. केंद्रीय प्राधिकरण [१][*****] पुढीलपैकी सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडील :—

(क) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये विधि सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धोरणे व तत्त्वे निर्धारित करणे ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये विधि सेवा उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनाकरिता अत्यंत प्रभावी व मितव्ययी योजना तयार करणे ;

(ग) त्यास स्वाधीन असणाऱ्या निधीचा उपयोग करणे आणि राज्य व जिल्हा प्राधिकरणांना निधीचे योग्य ते वाटप करणे ;

(घ) ग्राहक संरक्षण, पर्यावरण संरक्षण किंवा समाजातील दुर्बल घटकांशी विशेषरीत्या संबंधित इतर कोणतीही बाब या संबंधात सामाजिक न्यायासाठी न्यायालयीन प्रक्रियेद्वारे आवश्यक त्या उपाययोजना करणे आणि या प्रयोजनांकरिता सामाजिक कार्यकर्त्यांना विधिविषयक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे ;

(ङ) समाजातील दुर्बल घटकांना त्यांच्या हक्कांबद्दल शिक्षित करणे तसेच लोक अदालतींद्वारे, विवाद मिटविण्यास उत्तेजन देणे अशा दुहेरी हेतूने विशेषकरून, ग्रामीण क्षेत्रे, झोपडपट्ट्या किंवा कामगार वसाहतींमध्ये विधिविषयक साहाय्य शिबिरे आयोजित करणे ;

(च) वाटाघाटी, लवाद व समेट या मार्गाने विवाद मिटविण्यास उत्तेजन देणे ;

(छ) गरिबांना अशा सेवेची निकड आहे याचा विशेष संदर्भ देऊन विधिविषयक सेवांच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेणे व त्यास चालना देणे ;

(ज) संविधानाच्या भाग चार-क अंतर्गत नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांप्रती असलेली बांधिलकी सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे ;

(झ) विधिविषयक साहाय्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे ठराविक कालांतराने संनियंत्रण व मूल्यमापन करणे आणि या अधिनियमाअन्वये तरतूद करण्यात आलेल्या निधीद्वारे पूर्णतः किंवा अंशतः अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची व योजनांची स्वतंत्रपणे मूल्यमापन करण्याची तरतूद करणे ;

[२][(ञ) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये विधि सेवा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी त्याच्या स्वाधीन असलेल्या रकमेतून वेगवेगळ्या स्वयंसेवी सामाजिक सेवा संस्था आणि राज्य व जिल्हा प्राधिकरणे यांच्यासाठी विशिष्ट योजनांकरिता सहायक अनुदान देणे ;]

(ट) भारतीय वकील परिषदेशी विचारविनिमय करून विधिविषयक उपाययोजनात्मक विधि शिक्षण कार्यक्रम विकसित करणे आणि विद्यापीठे, विधि महाविद्यालये व इतर संस्था यांमध्ये उपाययोजनात्मक विधि केंद्रे चालविण्यास मार्गदर्शन करणे आणि त्याची आस्थापना व कामकाज यांवर देखरेख ठेवणे ;

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर गाळण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ठ) लोकांमध्ये विधि साक्षरतेचा व विधिविषयक जाणिवेचा प्रसार करण्यासाठी आणि विशेषतः समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक कल्याणकारी कायदे आणि इतर अधिनियमिती तसेच प्रशासकीय कार्यक्रम व उपाययोजना यांद्वारे हमी दिलेले हक्क, लाभ व विशेषाधिकार यांविषयी शिक्षित करण्यासाठी समुचित उपाययोजना हाती घेणे ;

(ड) तळागाळातील लोकांमध्ये विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, महिला आणि ग्रामीण व शहरी कामगार यांमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी समाज कल्याण संस्थांचा पाठिंबा मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे ; आणि

(ढ) [१][राज्य प्राधिकरणे, जिल्हा प्राधिकरणे, सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती, उच्च न्यायालय विधि सेवा समिती, तालुका विधि सेवा समिती व स्वयंसेवी सामाजिक सेवा संस्था] आणि इतर विधि सेवा संस्था यांच्या कार्याचा समन्वय साधणे, त्यावर संनियंत्रण ठेवणे आणि विधि सेवाविषयक कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी करण्याकरिता सर्वसाधारण निदेश देणे.

**केंद्रीय प्राधिकरणाने इतर अभिकरणांशी समन्वय साधून काम करणे.**

**५.** केंद्रीय प्राधिकरण, या अधिनियमाअन्वये आपली कार्ये पार पाडताना, उचित असेल तेथे गरीब लोकांना विधिविषयक सेवा देण्याच्या कामास चालना देण्यात गुंतलेली इतर शासकीय व अशासकीय अभिकरणे, विद्यापीठे आणि इतर संस्था यांच्याशी समन्वय साधून काम करील.

प्रकरण तीन

## राज्य विधि सेवा प्राधिकरण

**राज्य विधि सेवा प्राधिकरण.**

[२][**६.** (१) प्रत्येक राज्य शासन, या अधिनियमान्वये राज्य प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेल्या किंवा नेमून दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी, राज्याकरिता " विधि सेवा प्राधिकरण " या नावाने संबोधला जाणारा एक निकाय घटित करील ;

(२) राज्य प्राधिकरण पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल,—

(क) उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती, जो मुख्य आश्रयदाता असेल ;

(ख) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, राज्यपालाद्वारे नामनिर्देशित करावयाचा, उच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश, जो कार्यकारी अध्यक्ष असेल ; आणि

(ग) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे त्या शासनाकडून विहित करण्यात येईल असा अनुभव व अर्हता धारण करणाऱ्या अशा संख्येतील इतर सदस्य.

(३) राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, त्या शासनाकडून विहित करण्यात येतील किंवा राज्य प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षाकडून नेमून देण्यात येतील अशा, राज्य प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षाच्या अध्यक्षतेखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि अशी कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा निम्न दर्जा नसलेल्या, राज्य उच्च न्यायिक सेवेतील एखाद्या व्यक्तीची, राज्य प्राधिकरणाची सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करील :

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे ' कलम ६ ' ऐवजी दाखल करण्यात आले (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

परंतु असे की, राज्य प्राधिकरण घटित करण्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी राज्य विधि साहाय्य व सल्लागार मंडळाचा सचिव म्हणून काम करणाऱ्या एखाद्या व्यक्तीची, या पोट-कलमान्वये त्या पदासाठी नियुक्ती करण्यास अर्हताप्राप्त नसली तरीदेखील पाच वर्षांहून अधिक नाही इतक्या कालावधीसाठी त्या प्राधिकरणाची सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करता येऊ शकेल ;

(४) राज्य प्राधिकरणाचे सदस्य व सदस्य-सचिव यांचा पदावधी व त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा असतील ;

(५) राज्य प्राधिकरणास या अधिनियमाखालील आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासनाकडून, विहित करण्यात येईल एवढ्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल ;

(६) राज्य प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल असे वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि ते अशा इतर सेवा शर्तीच्या अधीन असतील ;

(७) राज्य प्राधिकरणाचे सदस्य-सचिव, अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन यांसह राज्य प्राधिकरणाचा प्रशासकीय खर्च, राज्याच्या एकत्रित निधीतून भागविण्यात येईल ;

(८) राज्य प्राधिकरणाचे सर्व आदेश व निर्णय, सदस्य-सचिव किंवा त्या प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला राज्य प्राधिकरणाचा इतर कोणताही अधिकारी अधिप्रमाणित करील ;

(९) राज्य प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ राज्य प्राधिकरणात कोणतेही पद रिक्त असल्याच्या कारणावरून, किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणांवरून विधिअग्राह्य ठरणार नाही.]

**राज्य प्राधिकरणाची कार्ये.**

**७.** (१) केंद्रीय प्राधिकरणाचे धोरण व निदेश अंमलात आणणे हे राज्य प्राधिकरणाचे कर्तव्य असेल ;

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्याच्या सर्वसाधारणतेला बाधा न येऊ देता राज्य प्राधिकरण पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडील :—

(क) या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या व्यक्तींना विधिविषयक सेवा देणे ;

(ख) [१][ लोक अदालती तसेच उच्च न्यायालयातील प्रकरणांसाठी असणाऱ्या लोक अदालती ] चालवणे ;

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ६ (एक) द्वारे " लोक अदालत " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(ग) प्रतिबंधात्मक व धोरणात्मक विधिविषयक साहाय्य कार्यक्रम हाती घेणे ; आणि

(घ) राज्य प्राधिकरण [१][ केंद्रीय प्राधिकरणाशी ] विचारविनिमय करून विनियमांद्वारे निश्चित करील अशी इतर कार्ये पार पाडणे ;

**राज्य प्राधिकरणाने इतर अभिकरणे, इत्यादींशी समन्वय साधून काम करणे, आणि केंद्रीय प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या निदेशांना अधीन राहणे.**

[२]**[८.** राज्य प्राधिकरण, आपली कार्ये पार पाडताना गरिबांना विधिविषयक सेवा देण्याच्या कामास चालना देण्यात गुंतलेली इतर शासकीय अभिकरणे, अशासकीय स्वयंसेवी सामाजिक सेवा संस्था, विद्यापीठे आणि इतर मंडळे यांच्याशी समन्वय साधून, योग्य रीतीने काम करील आणि तसेच, केंद्रीय प्राधिकरणाकडून त्यास लेखी स्वरुपात देण्यात येतील, अशा निदेशांचे पालन करील.

**उच्च न्यायालय विधि सेवा समिती.**

**८ क.** (१) राज्य प्राधिकरण, त्याने केलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्याच्या व अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्येक उच्च न्यायालयाकरिता " उच्च न्यायालय विधि सेवा समिती " या नावाने संबोधण्यात यावयाची एक समिती घटित करील ;

(२) ही समिती, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीने नामनिर्देशित करावयाच्या पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल,—

(क) उच्च न्यायालयाचा विद्यमान न्यायाधीश, जो अध्यक्ष असेल ; आणि

(ख) राज्य प्राधिकरणाने केलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल इतके व तसा अनुभव व अर्हता धारण करणारे इतर सदस्य.

(३) उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल असा अनुभव व अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीची, समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करील.

(४) समितीचे सदस्य व सचिव यांचा पदावधी व त्याच्याशी संबंधित इतर शर्ती, राज्य प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा असतील.

(५) समितीस, आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासन विहित करील इतक्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(६) समितीचे अधिकारी व इतर कर्मचारी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासन विहित करील इतके वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि ते अशा इतर सेवा शर्तींना अधीन असतील.

**जिल्हा विधि सेवा प्राधिकरण.**

**९.** (१) राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, या अधिनियमान्वये जिल्हा प्राधिकरणाला प्रदान केलेल्या किंवा नेमून दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्याकरिता जिल्हा विधि सेवा प्राधिकरण या नावाने संबोधण्यात यावयाचा एक निकाय घटित करील.

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र सरकारशी" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे, कलम ८ व ९ यांऐवजी दाखल करण्यात आली (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) जिल्हा प्राधिकरण, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून त्या शासनाने नामनिर्देशित करावयाच्या पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल—

(क) जिल्हा न्यायाधीश, जो समितीचा अध्यक्ष असेल ; आणि

(ख) राज्य शासन विहित करील तसा अनुभव व अर्हता धारण करणारे इतर सदस्य.

(३) राज्य प्राधिकरण, जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षाशी विचारविनिमय करून, अशा अध्यक्षाकडून नेमून देण्यात येतील अशा, त्या समितीच्या अध्यक्षाच्या अध्यक्षतेखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि अशी कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हा न्यायिक सेवेतील पदावर पद्स्थापित केलेल्या दुय्यम न्यायाधीशांच्या किंवा दिवाणी न्यायाधीशाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या, राज्य न्यायिक सेवेतील एखाद्या व्यक्तीची, जिल्हा प्राधिकरणाचा सचिव म्हणून नियुक्ती करील.

(४) जिल्हा प्राधिकरणाचे सदस्य व सचिव यांचा पदावधी व त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, राज्य प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा असतील.

(५) जिल्हा प्राधिकरणास, आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासन विहित करील इतक्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(६) जिल्हा प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, राज्य शासन विहित करील इतके वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि ते अशा इतर सेवा शर्तींना अधीन असतील.

(७) जिल्हा प्राधिकरणाचे सचिव, अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन यांसह प्रत्येक जिल्हा प्राधिकरणाचा प्रशासकीय खर्च, राज्याच्या एकत्रित निधीतून भागविण्यात येईल.

(८) जिल्हा प्राधिकरणाचे सर्व आदेश व निर्णय, सचिव किंवा त्या प्राधिकरणाच्या अध्यक्षाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला जिल्हा प्राधिकरणाचा इतर कोणताही अधिकारी अधिप्रमाणित करील.

(९) जिल्हा प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ जिल्हा प्राधिकरणात कोणतेही पद रिक्त असल्याच्या कारणावरून, किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.]

**जिल्हा प्राधिकरणाची कार्ये.**

**१०.** राज्य प्राधिकरणाकडून वेळोवेळी त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी, जिल्ह्यातील राज्य प्राधिकरणाची कार्ये पार पाडणे हे प्रत्येक जिल्हा प्राधिकरणाचे कर्तव्य असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्याच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता, जिल्हा प्राधिकरणास पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये पार पाडता येतील ;

[१][(क) जिल्ह्यातील तालुका विधि सेवा समितींची कार्ये व इतर विधि सेवा यांचा समन्वय साधणे.]

(ख) जिल्ह्यामध्ये लोक अदालतींचे आयोजन करणे ; आणि

(ग) राज्य प्राधिकरण, [२][***] विनियमांद्वारे निश्चित करील अशी इतर कार्ये पार पाडणे.

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ८ द्वारे खंड (क) ऐवजी दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "राज्य शासनाशी विचारविनिमय करून" हा मजकूर वगळण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

**११.** जिल्हा प्राधिकरण, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना, उचित असेल तेव्हा, गरिबांना विधिविषयक सेवा देण्याच्या कामास चालना देण्यात गुंतलेल्या इतर शासकीय व अशासकीय संस्था, विद्यापीठे आणि इतर संस्था यांच्याशी समन्वय साधून काम करील आणि तसेच केंद्रीय प्राधिकरणाकडून किंवा राज्य प्राधिकरणाकडून त्यास लेखी स्वरुपात देण्यात येतील, अशा निदेशांचे पालन करील. **जिल्हा प्राधिकरणाने इतर अभिकरणांशी समन्वय साधून काम करणे आणि केंद्रीय प्राधिकरण, इत्यादींकडून देण्यात आलेल्या निदेशांना अधीन राहणे.**

[1][**११क.** (१) राज्य प्राधिकरण, प्रत्येक तालुक्यासाठी किंवा मंडलासाठी किंवा तालुक्यांच्या किंवा मंडलांच्या गटासाठी तालुका सेवा समिती या नावाने संबोधण्यात यावयाची एक समिती घटित करील. **तालुका विधि सेवा समिती.**

(२) समिती, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल,—

(क) समितीच्या अधिकारितेत काम करणारा [2][वरिष्ठतम न्यायिक अधिकारी,] जो पदसिद्ध अध्यक्ष असेल ; आणि

(ख) शासनाकडून विहित करील इतके व तसा अनुभव व अर्हता धारण करणारे इतर सदस्य.

(३) समितीस, आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासन, विहित करील इतक्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(४) समितीचे अधिकारी व इतर कर्मचारी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, राज्य शासन विहित करील इतके वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि ते अशा इतर सेवा शर्तीना अधीन असतील.

(५) समितीचा प्रशासकीय खर्च, जिल्हा प्राधिकरणाद्वारे जिल्हा विधि सेवा साहाय्य निधीमधून भागविण्यात येईल.

**११ख.** तालुका विधि सेवा समितीस, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये पार पाडता येतील :— **तालुका विधि सेवा समितीची कार्ये.**

(क) तालुक्यातील विधिविषयक सेवांच्या कार्यांचा समन्वय साधणे ;

(ख) तालुक्यामध्ये लोक अदालतींचे आयोजन करणे ; आणि

(ग) जिल्हा प्राधिकरण त्यास नेमून देईल अशी कार्ये पार पाडणे. ]

प्रकरण चार

## विधिविषयक सेवा मिळण्याचा हक्क

**१२.** जिला प्रकरण दाखल करावयाचे आहे किंवा त्यात बचाव करावयाचा आहे अशी प्रत्येक व्यक्ती जर पुढील व्यक्तींपैकी असेल तर, ती व्यक्ती या अधिनियमान्वये विधिविषयक सेवा मिळण्यास हक्कदार असेल,— **विधिविषयक सेवा देण्यासाठी निकष.**

(क) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजातीची सदस्य असलेली व्यक्ती ;

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आली (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम २ अन्वये "वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (११ जून, २००२ रोजी व तेव्हापासून).

(ख) संविधानाच्या अनुच्छेद २३ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे माणसांचा अपव्यापार किंवा बिगार यास बळी पडलेल्या व्यक्ती ;

(ग) महिला किंवा बालक ;

[1][(घ) विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ याच्या कलम २ च्या खंड (एक) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे विकलांग असलेली व्यक्ती ;] १९९६ चा १.

(ङ) मोठी आपत्ती, वांशिक हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर, अवर्षण, भूकंप किंवा औद्योगिक आपत्ती यांना बळी पडलेल्या व्यक्तींसारख्या अकारण वंचितावस्थेतील व्यक्ती ; किंवा

(च) औद्योगिक कामगार ; किंवा

(छ) हवालातील तसेच, अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड (छ) च्या अर्थांतर्गत सुरक्षागृहामधील किंवा बाल न्याय अधिनियम, १९८६ याच्या कलम (२) च्या खंड (ञ) च्या अर्थांतर्गत बालगृहातील किंवा मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ याच्या कलम (२) च्या खंड (छ) च्या अर्थांतर्गत मनोविकृतीचिकित्सा रुग्णालयातील किंवा मनोविकृतीचिकित्सा शुश्रूषालयातील अभिरक्षेत असलेली व्यक्ती ; किंवा १९५६ चा १०४. १९८६ चा ५३. १९८७ चा १४.

[2][(ज) जर प्रकरण सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयासमोर असेल तर, नऊ हजार रुपयांपेक्षा किंवा राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा इतर अधिकतम रकमेपेक्षा कमी आणि जर प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर असेल तर, बारा हजार रुपयांपेक्षा किंवा केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा इतर अधिकतम रकमेपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेली व्यक्ती.]

**विधिविषयक सेवा मिळण्याचा हक्क.**

**१३.** (१) कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले सर्व किंवा कोणतेही निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्ती, विधिविषयक सेवा मिळण्यास हक्कदार असतील, मात्र, खटला भरण्याच्या किंवा त्यात बचाव करण्याच्या अशा व्यक्तीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तिक आहे, याबाबत संबंधित प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असली पाहिजे.

(२) एखाद्या व्यक्तीने तिच्या उत्पन्नासंबंधात केलेल्या शपथपत्राबाबत संबंधित प्राधिकाऱ्याला अविश्वास दाखवावा असे सकारण वाटत नसल्यास, असे शपथपत्र या अधिनियमाखालील विधिविषयक सेवेचा हक्क मिळविण्यासाठी तिला पात्र ठरविण्यास पुरेसे आहे, असे समजता येईल.

## प्रकरण पाच

## वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

**केंद्र सरकारकडून अनुदाने.**

**१४.** केंद्र सरकार, या बाबतीत संसदेकडून कायद्याद्वारे योग्य ते विनियोजन करण्यात आल्यावर या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वापर करण्याकरिता केंद्र सरकारला योग्य वाटेल अशा रकमा अनुदानाच्या स्वरुपात केंद्रीय प्राधिकरणाला देईल.

**राष्ट्रीय विधि सहाय्य निधी.**

**१५.** (१) केंद्रीय प्राधिकरण, राष्ट्रीय विधि साहाय्य निधी या नावाने संबोधण्यात यावयाचा एक निधी स्थापन करील आणि त्यामध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

---

१. सन १९९६ या अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७४ द्वारे, खंड (घ) ऐवजी दाखल करण्यात आला (७ फेब्रुवारी, १९९६ रोजी व तेव्हापासून).

२. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ यांच्या कलम १० द्वारे, खंड (ज) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(क) कलम १४ अन्वये केंद्र सरकारने अनुदानाच्या स्वरूपात दिलेल्या सर्व रकमा ;

(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, इतर कोणत्याही व्यक्तीकडून केंद्रीय प्राधिकरणाला देण्यात येतील अशी कोणतीही अनुदाने किंवा देणग्या ;

(ग) कोणत्याही न्यायालयाच्या आदेशानुसार किंवा इतर कोणत्याही मार्गाने केंद्रीय प्राधिकरणाला प्राप्त झालेली कोणतीही रक्कम.

(२) राष्ट्रीय विधि साहाय्य निधी पुढील खर्च भागविण्यासाठी वापरण्यात येईल :—

(क) राज्य प्राधिकरणाला दिलेल्या अनुदानासह या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या विधिविषयक सेवांचा खर्च ;

[१][(ख) सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीकडून देण्यात आलेल्या विधिविषयक सेवांचा खर्च ;

(ग) केंद्रीय प्राधिकरणाने भागविणे आवश्यक असेल असा इतर कोणताही खर्च.]

**राज्य विधी सहाय्य निधी.**

**१६.** (१) राज्य प्राधिकरण, राज्य विधि साहाय्य निधी या नावाने संबोधण्यात यावयाचा एक निधी स्थापन करील आणि त्यामध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्यास दिलेल्या सर्व रकमा किंवा केंद्रीय प्राधिकरणाने दिलेली कोणतीही अनुदाने ;

(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाकडून किंवा कोणत्याही व्यक्तीकडून राज्य प्राधिकरणाला देण्यात येतील अशी कोणतीही अनुदाने किंवा देणग्या ;

(ग) कोणत्याही न्यायालयाच्या आदेशानुसार किंवा इतर कोणत्याही मार्गाने राज्य प्राधिकरणाला प्राप्त झालेली कोणतीही रक्कम.

(२) राज्य विधि साहाय्य निधी, पुढील खर्च भागविण्यासाठी वापरण्यात येईल :—

(क) कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्याचा खर्च ;

[२][(ख) उच्च न्यायालय विधि सेवा समितीकडून देण्यात आलेल्या विधिविषयक सेवांचा खर्च ;

(ग) राज्य प्राधिकरणाने भागविणे आवश्यक असेल असा इतर कोणताही खर्च.]

**जिल्हा विधी सहाय्य निधी.**

**१७.** (१) प्रत्येक जिल्हा प्राधिकरण, जिल्हा विधि साहाय्य निधी नावाने संबोधण्यात यावयाचा एक निधी स्थापन करील आणि त्यामध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :–

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य प्राधिकरणाने, जिल्हा प्राधिकरणाला दिलेल्या सर्व रकमा किंवा दिलेली कोणतीही अनुदाने ;

[३][(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य प्राधिकरणाची पूर्व मान्यता घेऊन कोणत्याही व्यक्तीने जिल्हा प्राधिकरणाला द्यावयाची कोणतीही अनुदाने किंवा देणग्या ;]

(ग) कोणत्याही न्यायालयाच्या आदेशानुसार किंवा इतर कोणत्याही मार्गाने जिल्हा प्राधिकरणाला प्राप्त झालेली इतर कोणतीही रक्कम.

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ द्वारे खंड (ख) ऐवजी दाखल करण्यात आले (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे खंड (ख) ऐवजी दाखल करण्यात आले (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे खंड (ख) ऐवजी दाखल करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(२) जिल्हा विधि साहाय्य निधी, पुढील खर्च भागविण्यासाठी वापरण्यात येईल :—

(क) कलम १० [१][व ११ ख] यामध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्यांचा खर्च ;

(ख) जिल्हा प्राधिकरणाने भागविणे आवश्यक असेल असा इतर कोणताही खर्च.

लेखे व लेखापरीक्षा.

**१८.** (१) केंद्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा यथास्थिति, जिल्हा प्राधिकरण (यापुढे या कलमामध्ये ज्यांचा निर्देश " प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) योग्य ते लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि केंद्र सरकारने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित केले असेल अशा स्वरुपात व अशा रीतीने उत्पन्न व खर्चाचा लेखा आणि ताळेबंद यांसह वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील.

(२) प्राधिकरणांच्या लेख्यांची, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून तो विनिर्दिष्ट करील अशा कालांतराने लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात केलेला कोणताही खर्च, संबंधित प्राधिकरणाकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यास देय असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि या अधिनियमाअन्वये प्राधिकरणाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात त्याने नियुक्त केलेली इतर कोणतीही व्यक्ती यांना, अशा लेखापरीक्षेसंबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना शासकीय लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात जे हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात, तेच हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतील, आणि विशेषकरून पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके व इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा आणि या अधिनियमाखालील प्राधिकरणाच्या कोणत्याही कार्यालयांची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक याने किंवा याबाबत त्याने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले प्राधिकरणाचे लेखे व त्यावरील लेखापरीक्षा अहवाल, दरवर्षी प्राधिकरणांकडून केंद्र सरकारला किंवा यथास्थिति, राज्य शासनाला पाठविण्यात येतील.

[२][(५) केंद्र सरकार, पोट-कलम (४) अन्वये त्यास प्राप्त झालेले लेखे व लेखापरीक्षा अहवाल, ते प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(६) राज्य शासन, पोट-कलम (४) अन्वये त्यास प्राप्त झालेले लेखे व लेखापरीक्षा अहवाल, ते प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.]

## प्रकरण सहा

## लोक अदालती

लोक अदालतींचे आयोजन.

[३][**१९.** (१) प्रत्येक राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण किंवा सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती किंवा प्रत्येक उच्च न्यायालय विधि सेवा समिती किंवा यथास्थिति, तालुका विधि सेवा समिती, तिला योग्य वाटेल अशा कालांतराने व अशा ठिकाणी आणि अशा अधिकारितेचा वापर करण्यासाठी व अशा क्षेत्रांसाठी लोक अदालतींचे आयोजन करू शकेल.

(२) एखाद्या क्षेत्रासाठी आयोजित केलेल्या प्रत्येक लोक अदालतीमध्ये अशा लोक अदालतीचे आयोजन करणारे राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण किंवा सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती किंवा उच्च न्यायालय विधि सेवा समिती किंवा, यथास्थिति, तालुका विधि सेवा समिती यांच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रातील व अशा संख्येतील पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १३ द्वारे समाविष्ट करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे समाविष्ट करण्यात आला (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे "कलम १९ व २०" ऐवजी दाखल करण्यात आली (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(क) सेवेत असलेले किंवा सेवानिवृत्त झालेले न्यायिक अधिकारी ; आणि

(ख) इतर व्यक्ती.

(३) सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीने आयोजित केलेल्या लोक अदालतीकरिता पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या इतर व्यक्तींचा अनुभव व अर्हता, भारताच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून, केंद्र सरकार विहित करील त्याप्रमाणे असेल.

(४) पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या लोक अदालतींव्यतिरिक्त अन्य लोक अदालतीकरिता पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या इतर व्यक्तींचा अनुभव व अर्हता, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असेल.

(५) लोक अदालतीस, ज्या न्यायालयाकरिता लोक अदालतीचे आयोजन केले असेल अशा कोणत्याही न्यायालयासमोर—

(एक) प्रलंबित असलेले कोणतेही प्रकरण ; किंवा

(दोन) अशा न्यायालयाच्या अधिकारितेत येणारी परंतु त्याच्या पुढे न आणलेली कोणतीही बाब,

यासंबंधात निर्णय करण्याची आणि त्याबाबतच्या विवादातील पक्षकारांमध्ये तडजोड किंवा समझोता घडवून आणण्याची अधिकारिता असेल :

परंतु असे की, लोक अदालतीला कोणत्याही कायद्यान्वये आपसात मिटवण्याजोगा नसेल अशा अपराधाशी संबंधित प्रकरणाच्या किंवा बाबीच्या संबंधात कोणतीही अधिकारिता नसेल.

**लोक अदालतीने प्रकरणांची दखल घेणे.**

**२०.** (१) ज्यावेळी कलम १९ च्या पोट-कलम (५) च्या खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रकरणात समझोता करण्यासाठी लोक अदालतीकडे प्रकरण निर्देशित करण्याकरिता,—

(एक) (क) त्यातील पक्षकार संमती देतील ; किंवा

(ख) त्यांच्यापैकी कोणताही एक पक्षकार, न्यायालयाकडे अर्ज करील आणि जर अशा न्यायालयाची, अशा समझोत्याच्या शक्यतेबाबत प्रथमदर्शनी खात्री पटली असेल ; किंवा

(दोन) त्या बाबींची, लोक अदालतीने दखल घेणे उचित ठरेल अशी न्यायालयाची खात्री पटली असेल,

त्याबाबतीत न्यायालय, ते प्रकरण लोक अदालतीकडे निर्देशित करील :

परंतु असे की, असे न्यायालय, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, खंड (एक) च्या उपखंड (ख) किंवा खंड (दोन) अन्वये, कोणतेही प्रकरण लोक अदालतीकडे निर्देशित करणार नाही.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये लोक अदालतीचे आयोजन करणाऱ्या प्राधिकरणास किंवा समितीस, कलम १९ च्या पोट-कलम (५) च्या खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीतील, कोणत्याही एका पक्षकाराकडून लोक अदालतीद्वारे निर्णय करावयाची गरज असलेल्या अशा बाबीसंबंधात अर्ज प्राप्त झाल्यावर, अशी बाब निर्णय करण्यासाठी लोक अदालतीकडे निर्देशित करता येईल :

परंतु असे की, दुसऱ्या पक्षकारांस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज कोणतीही बाब लोक अदालतीकडे निर्देशित करण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये लोक अदालतीकडे एखादे प्रकरण निर्देशित करण्यात आले असेल किंवा पोट-कलम (२) अन्वये त्याच्याकडे एखाद्या बाबीचा निर्देश करण्यात आला असेल तर लोक अदालत, असे प्रकरण किंवा बाब निकालात काढण्याची कार्यवाही करील आणि पक्षकारांमध्ये तडजोड किंवा समझोता घडवून आणील.

(४) प्रत्येक लोक अदालत, या अधिनियमाअन्वये त्याच्या समोरील कोणत्याही निर्देशाचा निर्णय करताना, पक्षकारांमध्ये अत्यंत शीघ्रतेने तडजोड किंवा समझोता घडवून आणण्याची कार्यवाही करील आणि याकरिता न्याय, समन्याय, निःपक्ष भूमिका या तत्वांचे आणि इतर कायदेशीर तत्वांचे पालन करील.

(५) पक्षकारांमध्ये कोणतीही तडजोड किंवा समझोता होऊ शकला नाही, या कारणास्तव लोक अदालतीद्वारे कोणताही निवाडा देण्यात आला नसेल त्याबाबतीत, लोक अदालत, त्या प्रकरणाचा अभिलेख, ज्या न्यायालयाकडून पोट-कलम (१) अन्वये निर्देश प्राप्त झालेला असेल त्या न्यायालयाकडे कायद्यानुसार निकालात काढण्यासाठी परत करील.

(६) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींमध्ये, पक्षकारांमध्ये कोणतीही तडजोड किंवा समझोता होऊ शकला नाही, या कारणास्तव लोक अदालतीद्वारे कोणताही निवाडा देण्यात आला नसेल त्याबाबतीत, लोक अदालत, त्या पक्षकारांना न्यायालयाकडे दाद मागण्याचा सल्ला देईल.

(७) पोट-कलम (५) अन्वये प्रकरणाचा अभिलेख न्यायालयाकडे परत पाठविण्यात आला असेल त्याबाबतीत असे न्यायालय, पोट-कलम (१) अन्वये असे प्रकरण अशा निर्देशापूर्वी ज्या टप्प्यावर होते त्या टप्प्यापासून त्यावर कार्यवाही करील.]

**लोक अदालतीचा निवाडा.**

**२१.** (१) लोक अदालतीचा प्रत्येक निवाडा हा दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा किंवा यथास्थिति, अन्य कोणत्याही न्यायालयाचा आदेश असल्याचे मानण्यात येईल आणि जेव्हा कलम २० च्या पोट-कलम (१) अन्वये त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या प्रकरणात लोक अदालतीद्वारे तडजोड किंवा समझोता करण्यात आला असेल त्याबाबतीत अशा प्रकरणात प्रदान केलेली न्यायालय फी, न्यायालय फी अधिनियम, १८७० या अन्वये तरतूद केलेल्या रीतीने परत करण्यात येईल. १८७० चा ७.

(२) लोक अदालतीद्वारे करण्यात आलेला प्रत्येक निवाडा अंतिम असेल आणि विवादातील सर्व पक्षकारांवर बंधनकारक असेल आणि या निवाड्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात अपील दाखल करता येणार नाही.

**[१][लोक अदालतीचे] किंवा स्थायी लोक अदालतीचे अधिकार.**

**२२.** [१][ (१) लोक अदालतीला किंवा स्थायी लोक अदालतीला ] या अधिनियमाखालील कोणताही निर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ, पुढील बाबीसंबंधात, दिवाणी न्यायालयाला दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये जे अधिकार निहित केलेले असतील तेच, अधिकार असतील :—

(क) कोणत्याही साक्षीदाराला समन्स काढणे आणि त्यास उपस्थित राहण्यास भाग पाडणे व त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेणे व सादर करणे ;

(ग) शपथपत्रांवर साक्षीपुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत यांची मागणी करणे ; आणि

(ङ) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

---

१. सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ द्वारे " लोक अदालती " याऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला (११ जून, २००२ रोजी व तेव्हापासून) .

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत केलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता प्रत्येक [१][लोक अदालत किंवा स्थायी लोक अदालत ] यांना त्यांच्यासमोर येणारा कोणताही विवाद निकालात काढण्यासाठी त्यांची स्वतःची कार्यपद्धती विनिर्दिष्ट करण्याचे आवश्यक ते अधिकार असतील.

१८६० चा ४५. १९७४ चा २.

(३) [१][ लोक अदालत किंवा स्थायी लोक अदालत ] यांच्यापुढील सर्व कार्यवाही ही भारतीय दंड संहिता, १८६० ची कलमे १९३, २१९ आणि २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही मानण्यात येईल आणि प्रत्येक [१][ लोक अदालत किंवा स्थायी अदालत ] हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९५ आणि प्रकरण सव्वीसच्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

## [२][ प्रकरण सहा क

## कोर्टकचेरी करण्यापूर्वी समेट आणि समझोता

**२२ क.** या प्रकरणात आणि कलम २२ आणि २३ च्या प्रयोजनार्थ, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) " स्थायी लोक अदालत " याचा अर्थ, कलम २२ ख च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेली स्थायी लोक अदालत असा आहे ;

(ख) " लोकोपयोगी सेवा " याचा अर्थ, कोणतीही,—

(एक) हवाई मार्ग, रस्ते किंवा जलमार्गाद्वारे प्रवासी किंवा माल वाहून नेण्यासाठीची वाहतूक सेवा किंवा

(दोन) टपाल, तार किंवा दूरध्वनी सेवा ; किंवा

(तीन) कोणत्याही आस्थापनेद्वारे जनतेला होणारा वीज, दिवाबत्ती किंवा पाणीपुरवठा ; किंवा

(चार) सार्वजनिक साफसफाई आणि स्वच्छता यंत्रणा ; किंवा

(पाच) रुग्णालय किंवा दवाखाना यातील सेवा : किंवा

(सहा) विमा सेवा,

असा आहे, आणि त्यामध्ये केंद्र सरकार किंवा, यथास्थिति, राज्य शासन सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी लोकोपयोगी सेवा म्हणून घोषित करील, अशा कोणत्याही सेवेचा समावेश होतो.

**२२ ख.** (१) कलम १९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्रीय प्राधिकरण किंवा यथास्थिति, प्रत्येक राज्य प्राधिकरण, अधिसूचनेद्वारे, एका किंवा अधिक लोकोपयोगी सेवांच्या बाबतीत त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी आणि अशा अधिकारीतेचा वापर करण्यासाठी आणि अशा क्षेत्रांसाठी स्थायी लोक अदालत स्थापन करील. **स्थायी लोक अदालत स्थापन करणे.**

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेली प्रत्येक स्थायी लोक अदालत ही, अशी लोक अदालत स्थापन करणाऱ्या केंद्रीय प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, राज्य प्राधिकरणाने नियुक्ती करावयाच्या पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल—

(क) जिल्हा न्यायाधीश किंवा अपर जिल्हा न्यायाधीश या पदावर सध्या असलेली किंवा पूर्वी असलेली किंवा जिल्हा न्यायाधीशापेक्षा वरच्या दर्जाचे न्यायिक पद धारण केलेली व्यक्ती, स्थायी लोक अदालतीची अध्यक्ष असेल.

(ख) केंद्रीय प्राधिकरणाच्या किंवा, यथास्थिति, राज्य प्राधिकरणाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारने किंवा, यथास्थिति, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या लोकोपयोगी सेवेतील पुरेसा अनुभव धारण केलेल्या इतर दोन व्यक्ती,

---

१. सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ द्वारे " लोक अदालती " याऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला (११ जून, २००२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियम कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आले (११ जून, व तेव्हापासून).

आणि अध्यक्ष व खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या इतर व्यक्ती यांच्या नियुक्तीच्या इतर अटी व शर्ती, केंद्र सरकार विहित करील त्याप्रमाणे असतील.

**स्थायी लोक अदालतीने प्रकरणांची दखल घेणे.**

**२२ ग.** (१) एखाद्या विवादातील कोणत्याही पक्षकारास कोणत्याही न्यायालयापुढे विवाद आणला जाण्यापूर्वी, त्या विवादात समझोता करण्यासाठी स्थायी लोक अदालतीकडे अर्ज करता येईल :

परंतु असे की, स्थायी लोक अदालतीस कोणत्याही कायद्यान्वये आपसात मिटविण्याजोग्या नसलेल्या अपराधाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात अधिकारिता नसेल :

परंतु आणखी असे की, स्थायी लोक अदालतीला, दहा लाखांहून अधिक मूल्य असलेल्या विवादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात देखील अधिकारिता नसेल :

परंतु असेही की, केंद्र सरकारला केंद्रीय प्राधिकरणाशी विचारविनिमय करून दुसऱ्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेली दहा लाख रुपयांची मर्यादा अधिसूचनेद्वारे वाढवता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थायी लोक अदालतीकडे अर्ज करण्यात आल्यानंतर, त्या अर्जातील कोणताही पक्षकार त्याच विवादासंबंधात कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेचा आधार घेणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये स्थायी लोक अदालतीकडे अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, स्थायी लोक अदालत—

(क) अर्जातील प्रत्येक पक्षकाराला अर्जातील विवादाची तथ्ये आणि स्वरूप, अशा विवादातील मुद्दे किंवा वादप्रश्न, आणि अशा मुद्द्यांच्या किंवा, यथास्थिति, वादप्रश्नांच्या पुष्ट्यर्थ किंवा त्यांच्या विरोधात विसंबून रहावयाचे आहे ती कारणे नमूद केलेले एक लेखी कथन त्याच्यापुढे दाखल करण्याचे निदेश देईल, आणि अशा पक्षकारास, अशा तथ्यांचे आणि कारणांचे प्रमाण म्हणून त्यास उचित वाटेल असा कोणताही दस्तऐवज व इतर पुरावा अशा कथनासोबत जोडता येईल, आणि अशा कथनाची प्रत, अशा दस्तऐवजाच्या व पुराव्याच्या प्रतीसह, कोणतीही असल्यास, अर्जातील प्रत्येक पक्षकाराला पाठवील ;

(ख) अर्जातील कोणत्याही पक्षकाराला, समेट कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यात त्याच्यापुढे अतिरिक्त कथन दाखल करण्यास फर्माविता येईल ;

(ग) कोणत्याही पक्षकाराकडून त्याला मिळालेला कोणताही दस्तऐवज किंवा कथन अर्जातील दुसऱ्या पक्षकाराला कळवील, जेणेकरून दुसऱ्या पक्षकाराला त्याचे उत्तर दाखल करणे शक्य होईल.

(४) स्थायी लोक अदालतीचे समाधान होण्यासाठी पोट-कलम (३) अन्वये कथन, अतिरिक्त कथन आणि उत्तर, कोणतेही असल्यास, दाखल करण्यात येईल तेव्हा, ते न्यायालय, विवादाची परिस्थिती लक्षात घेऊन त्यास योग्य वाटेल अशा रीतीने अर्जातील पक्षकारांमध्ये समेट घडवून आणण्याची कार्यवाही करील.

(५) स्थायी लोक अदालत, पोट-कलम (४) अन्वये समेट कार्यवाही करताना, पक्षकारांना विवादात सलोख्याने समेट घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नात स्वतंत्रपणे आणि निःपक्षपातीपणे साहाय्य करील.

(६) अर्जातील संबंधित विवादाच्या समेटाच्या कार्यवाहीत स्थायी लोक अदालतीला सद्भावपूर्वक सहकार्य करणे आणि स्थायी लोक न्यायालयासमोर साक्षीपुरावा किंवा अन्य संबंधित दस्तऐवज सादर करण्यासाठी त्याच्या निदेशाचे पालन करणे हे अर्जातील प्रत्येक पक्षकाराचे कर्तव्य असेल.

(७) जेव्हा उपरोक्त समेट कार्यवाहीमध्ये अशा कार्यवाहीत पक्षकारांना मान्य होतील अशी समझोत्याची मूलतत्वे अस्तित्वात आहे असे स्थायी लोक अदालतीचे मत असेल तेव्हा स्थायी लोक अदालतीस, विवादाच्या संभाव्य समझोत्याच्या अटी तयार करता येतील आणि संबंधित पक्षकारांना त्या अवलोकनासाठी देता येतील आणि जर विवादाच्या समझोत्याबाबत पक्षकारांचे एकमत झाले तर, ते समझोता करारावर स्वाक्षऱ्या करतील आणि स्थायी लोक अदालत त्यानुसार निवाडा देईल आणि संबंधित असलेल्या प्रत्येक पक्षकाराला त्याची प्रत देईल.

(८) जेव्हा पक्षकारांचे पोट-कलम (७) अन्वये एकमत झाले नसेल तेव्हा, स्थायी लोक अदालत जर विवाद कोणत्याही अपराधाशी संबंधित नसेल तर, विवादांवर निर्णय देईल.

**२२ घ.** स्थायी लोक अदालत, या अधिनियमान्वये समेट कार्यवाही करताना किंवा योग्यायोग्यतेनुसार विवादाचा निर्णय करताना नैसर्गिक न्याय, वस्तुनिष्ठता, निःपक्षपातीपणा, समन्याय या तत्वांचे आणि इतर न्यायतत्वांचे पालन करील आणि ती दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आणि भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ यांना बांधील असणार नाही. **स्थायी लोक अदालतीची कार्यपद्धती.**

१९०८ चा ५.
१८७२ चा १.

**२२ ङ.** (१) योग्यायोग्यतेनुसार किंवा समझोता करारानुसार या अधिनियमान्वये करण्यात आलेला स्थायी लोक अदालतीस प्रत्येक निवाडा अंतिम असेल व तो सर्व पक्षकारांवर आणि त्याखाली दावा सांगणाऱ्या व्यक्तींवर बंधनकारक असेल. **स्थायी लोक अदालतीचा निवाडा अंतिम असणे.**

(२) या अधिनियमान्वये स्थायी लोक अदालतीचा प्रत्येक निवाडा हा दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा असल्याचे मानण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये, स्थायी लोक अदालतीने केलेला निवाडा, स्थायी लोक अदालतीचा घटक असणाऱ्या व्यक्तींच्या बहुमताद्वारे केलेला असेल.

(४) या अधिनियमान्वये, स्थायी लोक अदालतीद्वारे करण्यात आलेला प्रत्येक निवाडा अंतिम असेल आणि त्यास कोणत्याही मूळ दाव्यात, अर्जात किंवा दरख्वास्तीच्या कार्यवाहीत तो प्रश्नास्पद करण्यात येणार नाही.

(५) स्थायी लोक अदालतीस त्याने केलेला कोणताही निवाडा स्थानिक अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयाकडे पाठविता येईल आणि असे दिवाणी न्यायालय, जणू काही त्यानेच हुकूमनामा दिला होता असे समजून त्या आदेशाची अंमलबजावणी करील.]

प्रकरण सात

## संकीर्ण

[१]**[२३.** केंद्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरणे, जिल्हा प्राधिकरणे, सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती, उच्च न्यायालय विधि सेवा समित्या, तालुका विधि सेवा समित्या यांचे सदस्य तसेच सदस्य-सचिव किंवा, यथास्थिति, सचिव आणि अशी प्राधिकरणे, समित्या यांचे अधिकारी व इतर कर्मचारी आणि [२][लोक अदालतींचे सदस्य किंवा स्थायी लोक अदालतींचे घटक असणाऱ्या व्यक्ती], यांना भारतीय दंड संहिता याच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. **प्राधिकरणे, समित्या आणि लोक अदालती यांचे सदस्य आणि कर्मचारी वर्ग हे लोकसेवक असणे.**

१८६० चा ४५.

**२४.** या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा विनियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसंबंधात,— **सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.**

(क) केंद्र सरकार किंवा राज्य शासन ;

(ख) केंद्रीय प्राधिकरणाचे प्रमुख आश्रयदाता, कार्यकारी अध्यक्ष, सदस्य किंवा सदस्य-सचिव किंवा अधिकारी किंवा इतर कर्मचारी ;

(ग) राज्य प्राधिकरणाचे प्रमुख आश्रयदाता, कार्यकारी अध्यक्ष, सदस्य किंवा सदस्य-सचिव किंवा अधिकारी किंवा इतर कर्मचारी ;

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १७ द्वारे कलम २३ व २४ यांऐवजी दाखल करण्यात आली (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ५ द्वारे " लोक अदालतीचे सदस्य " याऐवजी दाखल करण्यात आला (११ जून, २००२ रोजी व तेव्हापासून).

(घ) सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समिती, उच्च न्यायालय विधि सेवा समित्या, तालुका विधि सेवा समित्या किंवा जिल्हा प्राधिकरण यांचे अध्यक्ष, सचिव, सदस्य किंवा अधिकारी किंवा इतर कर्मचारी;

(ङ) उपखंड (ख) ते (घ) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही प्रमुख आश्रयदाता, कार्यकारी अध्यक्ष, अध्यक्ष, सदस्य, सदस्य-सचिव यांनी प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती,

यांच्या विरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.] ;

**अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.**

**२५.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये या अधिनियमाशी विसंगत असलेली कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात असतील.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**२६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करता येतील :

परंतु असे की, या अधिनियमास राष्ट्रपतीची अनुमती मिळाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**केंद्र सरकारचे नियम करण्याचे अधिकार.**

[१][**२७.** (१) केंद्र सरकारला, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता, अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) अन्वये केंद्रीय प्राधिकरणाच्या इतर सदस्यांची संख्या, अनुभव आणि अर्हता ;

(ख) कलम ३ च्या पोट-कलम (३) अन्वये केंद्रीय प्राधिकरणाच्या सदस्य-सचिवाचा अनुभव व अर्हता आणि त्याचे अधिकार व कार्ये ;

(ग) कलम ३ च्या पोट-कलम (४) अन्वये केंद्रीय प्राधिकरणाचे सदस्य आणि सदस्य-सचिव यांचा पदावधी व त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती ;

(घ) कलम ३ च्या पोट-कलम (५) अन्वये केंद्रीय प्राधिकरणाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची संख्या ;

(ङ) कलम ३ च्या पोट-कलम (६) अन्वये केंद्रीय प्राधिकरणाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या शर्ती आणि वेतन व भत्ते ;

(च) कलम ३ क च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीच्या सदस्यांची संख्या, अनुभव व अर्हता ;

(छ) कलम ३ क च्या पोट-कलम (३) अन्वये सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीच्या सचिवाचा अनुभव व अर्हता ;

(ज) कलम ३क च्या पोट-कलम (५) अन्वये सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची संख्या आणि त्या कलमाच्या पोट-कलम (६) अन्वये त्यांच्या सेवेच्या शर्ती व त्यांना देय असलेले वेतन व भत्ते ;

---

१. सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १८ द्वारे " कलमे २७, २८ व २९" यांऐवजी दाखल करण्यात आली (२९ ऑक्टोबर, १९९४ रोजी व तेव्हापासून).

(झ) जर प्रकरण सर्वोच्च न्यायालयापुढे असेल तर, कलम १२ च्या पोट-कलम (ज) अन्वये विधिविषयक सेवांसाठी हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नाची उच्च मर्यादा ;

(ञ) कलम १८ अन्वये केंद्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण यांचे लेखे ज्या रीतिने ठेवण्यात येतील ती रीत ;

(ट) कलम १९ च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीद्वारे आयोजित करण्यात आलेल्या लोक अदालतीच्या इतर व्यक्तींचा अनुभव व अर्हता ;

(ठ) कलम २२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ङ) खालील इतर बाबी ;

[1][ (ठक) कलम २२ख च्या पोट-कलम (२) अन्वये अध्यक्ष व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या इतर अटी व शर्ती ;]

(ड) विहित करावयाची किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

**राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.**

**२८.** (१) राज्य शासनाला, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता, अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) अन्वये राज्य प्राधिकरणाच्या इतर सदस्यांची संख्या, अनुभव आणि अर्हता ;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (३) अन्वये राज्य प्राधिकरणाचे सदस्य-सचिव यांचे अधिकार व कार्ये ;

(ग) कलम ६ च्या पोट-कलम (४) अन्वये राज्य प्राधिकरणाचे सदस्य आणि सदस्य-सचिव यांचा पदावधी व त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती ;

(घ) कलम ६ च्या पोट-कलम (५) अन्वये राज्य प्राधिकरणाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची संख्या ;

(ङ) कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये राज्य प्राधिकरणाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या सेवा शर्ती आणि वेतन व भत्ते ;

(च) कलम ८क च्या पोट-कलम (३) अन्वये उच्च न्यायालय विधि सेवा समितीच्या सचिवाचा अनुभव व अर्हता ;

(छ) कलम ८क च्या पोट-कलम (५) अन्वये उच्च न्यायालय विधि सेवा समितीचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची संख्या आणि या कलमाच्या पोट-कलम (६) अन्वये त्यांच्या सेवा शर्ती व त्यांना देय असलेले वेतन व भत्ते ;

(ज) कलम ९ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये जिल्हा प्राधिकरणाच्या सदस्यांची संख्या, अनुभव व अर्हता ;

(झ) कलम ९ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हा प्राधिकरणाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची संख्या ;

(ञ) कलम ९ च्या पोट-कलम (६) अन्वये जिल्हा प्राधिकरणाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या सेवा शर्ती आणि वेतन व भत्ते ;

---

१. सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ६ द्वारे समाविष्ट करण्यात आला (१ जून, २००२ रोजी व तेव्हापासून).

(ट) कलम ११क च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये तालुका विधि सेवा समितीच्या सदस्यांची संख्या, अनुभव व अर्हता ;

(ठ) कलम ११क च्या पोट-कलम (३) अन्वये तालुका विधि सेवा समितीचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची संख्या ;

(ड) कलम ११क च्या पोट-कलम (४) अन्वये तालुका विधि सेवा समितीचे अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या सेवा शर्ती आणि वेतन व भत्ते ;

(ढ) जर खटला, सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त अन्य न्यायालयापुढे असेल तर, कलम १२ च्या पोट-कलम (ज) अन्वये विधिविषयक सेवांसाठी हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नाची उच्च मर्यादा ;

(ण) कलम १९ च्या पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींहून इतर लोक अदालतीच्या इतर व्यक्तींचा अनुभव आणि अर्हता ;

(त) विहित करावयाची किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

**केंद्रीय प्राधिकरणाचा विनियम करण्याचा अधिकार.**

**२९.** (१) केंद्रीय प्राधिकरणास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व बाबींची तरतूद करण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम अधिसूचनेद्वारे करता येतील.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाधा न येऊ देता, अशा विनियमांद्वारे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल,—

(क) कलम ३क च्या पोट-कलम (१) अन्वये सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीचे अधिकार आणि कार्ये ;

(ख) कलम ३क च्या पोट-कलम (४) अन्वये सर्वोच्च न्यायालय विधि सेवा समितीचे सदस्य आणि सचिव यांचा पदावधी आणि त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती ;

**राज्य प्राधिकरणाचा विनियम करण्याचा अधिकार.**

**२९क.** (१) राज्य प्राधिकरणास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व बाबींची तरतूद करण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम अधिसूचनेद्वारे करता येतील ;

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता अशा विनियमांद्वारे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (घ) अन्वये राज्य प्राधिकरणाने पार पाडावयाची इतर कार्ये ;

(ख) कलम ८क च्या पोट-कलम (१) अन्वये उच्च न्यायालय विधि सेवा समितीचे अधिकार आणि कार्ये ;

(ग) कलम ८क च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये उच्च न्यायालय विधि सेवा समितीच्या सदस्यांची संख्या, अनुभव व अर्हता ;

(घ) कलम ८क च्या पोट-कलम (४) अन्वये उच्च न्यायालय विधि सेवा समितीचे सदस्य आणि सचिव यांचा पदावधी आणि त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती ;

(ङ) कलम ९ च्या पोट-कलम (४) अन्वये जिल्हा प्राधिकरणाचे सदस्य आणि सचिव यांचा पदावधी आणि त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती ;

(च) कलम ८क च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये उच्च न्यायालय विधि सेवा समितीच्या सदस्यांची संख्या, अनुभव व अर्हता ;

(छ) कलम १० च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) अन्वये जिल्हा प्राधिकरणाने पार पाडावयाची इतर कार्ये ;

(ज) कलम ११क च्या पोट-कलम (३) अन्वये तालुका विधि सेवा समितीचे सदस्य आणि सचिव यांचा पदावधी आणि त्यांच्याशी संबंधित इतर शर्ती. ]

**नियम व विनियम ठेवणे.**

**३०.** (१) केंद्र सरकारकडून या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम आणि त्याखाली केंद्रीय प्राधिकरणाकडून करण्यात आलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले अथवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाधा येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम आणि त्याखाली राज्य प्राधिकरणाने केलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवला जाईल.

---